| MHKO100008992018 | नियमित दिवाणी दावा क्र. १८३/२०१८ मधील<br>नि. क्र. ३६ खालील आदेश<br>सौ. शांता पांडूरंग पाटील विरुध्द श्री.प्रशांत सुदाम पाटील वगैरे |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ६ रुल १७ व ऑर्डर १ रुल १०(२) प्रमाणे नि.१ मध्ये दुरुस्ती करणेसाठी दाखल केलेला आहे.

२. <u>वादीचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे.</u>

प्रस्तुत कामी वादीचे कथन असे की, प्रस्तुत दावा वादींनी प्रतिवादी यांचेविरुध्द हक्कज्ञापनासाठी, वाटपासाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र. ५ ते १० हे दावा जमिनीतील सहहिस्सेदार असल्याने वाटपाचेवेळी त्यांची हरकत राहू नपये म्हणून त्यांना याकामी आवश्यक पक्षकार केले आहे. त्यांना दावेचे समन्स गेल्यानंतर प्रतिवादी क्र. ६ श्री.रामा अंतु मांग, प्रतिवादी क्र. ७ सोनाबाई बाप विठु मांग उर्फ आयवाळे व प्रतिवादी क्र. ९ बाळाबाई लक्ष्मण दुंडे हे मयत असल्याचा बेलीफ रिपोर्ट याकामी आलेला आहे. प्रतिवादी क्र. ६ रामा अंतु मांग हे दिनांक ०४/०८/१९९६ रोजी मयत असल्याचे मयत दाखल्यावरुन दिसून येते. त्यांना शिवाजी रामचंद्र आयवाळे (मांग) हे सरळ व कायदेशिर वारस आहेत. वादीच्या माहितीनुसार त्यांचे शिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. तरी प्रतिवादी क्र. ६ यांचे नावास कंस करुन त्या ठिकाणी मयत वारस शिवाजी रामचंद्र आयवाळे (मांग), व.व. ३५, धंदा शेती व नोकरी, रा. कडगांव, तालुका गडहिंग्लज असे नमुद करणेस परवानगी मिळावी. तसेच प्रतिवादी क्र. ७ सोनाबाई बाप विठू मांग (आयवाळे) या दिनांक २४/०४/२००९ रोजी मयत असल्याचे मयत दाखल्यावरुन समजून येते. त्यांना
अ) श्री. अशोक विठु अयवाळे (मांग) व.व. ३५, धंदा शेती, रा.कडगांव, तालुका गडहिंग्लज.
ब) श्री.पुंडलिक विठु आयवाळे (मांग) व.व.३१, धंदा शेती, रा.कडगांव, तालुका गडहिंग्लज
क) लक्ष्मी विठु आयवाळे (मांग) व.व. २८ वर्षे, धंदा शेती, रा. कडगांव, तालुका गडहिंग्लज
हे वादीच्या माहितीप्रमाणे सरळ व कायदेशिर वारस आहेत. तरी प्रतिवादी क्र. ७ यांचे नावास

कंस करुन त्या ठिकाणी मयत वारस म्हणून वर नमुद नावे समाविष्ट करणेस परवानगी मिळावी तसेच प्रतिवादी क्र. ९ बाळाबाई लक्ष्मण दुंडे उर्फ हुले (मांग) या दिनांक १३/११/२००५ रोजी मयत झाल्या असून त्यांना अ) श्री.संजय लक्ष्मण दुंडे उर्फ हुले (मांग), व.व.४०, धंदा शेती, रा. कडगांव, तालुका गडहिंग्लज हे सरळ व कायदेशिर वारस आहेत. तरी प्रतिवादी क्र. ९ यांचे नावास कंस करुन त्या ठिकाणी मयत वारस म्हणून वर नमुद नाव समाविष्ट करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. सदरचा अर्ज मंजूर झालेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट नामंजूर झाल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. प्रतिवादी क्र. ६ ते ९ हे दावा जमीनीतील सहहिस्सेदार होते व त्यांचे पश्चात त्यांचे वारस हे दावा जमीनीचे सहहिस्सेदार आहेत. त्यामुळे प्रस्तुत कामाचा गुणदोषावर चालून निर्णय होण्यासाठी तसेच कामातील गुंतागुंत टाळण्यासाठी तसेच अनेकविध दावे टाळण्यासाठी प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर येणे अत्यंत गरजेचे आहे. सबब वादी यांनी प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

**३.** प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे सादर करुन असे कळविले आहे की, सदरचे अर्जातील मजकुर चुकीचा आहे. सबब सदरचा अर्ज फेटाळणेत यावी अशी विनंती केली आहे.

**४.** प्रस्तुतचा अर्जाचे अवलोकन केले आणि दोन्ही बाजुचे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. यावरुन खालील मुद्दे माझ्या पुढे उपस्थित झाले त्यावरील कारणांसहित निष्कर्ष खालील प्रमाणे

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी यांनी मागीतलेल्या दुरुस्तीमुळे त्यांचे मुळ दाव्याचे स्वरुपात बदल होणार आहे काय ? | **नाही** |
| २. | सदरची दुरुस्ती ही मुळ दाव्याच्या अंतिम निकालाकरीता आवश्यक आहे काय ? | **होय** |

३. काय आदेश ? **अंतिम आदेशाप्रमाणे**

## <u>-कारणमिमांसा-</u>

**५.** अभिलेखावरील कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता व दोन्ही बाजुचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला असता असे लक्षात येते की, प्रस्तुतचा दावा हा वादीने हक्कज्ञापनासाठी, वाटपासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी नंबर ६ हे दिनांक ०४/०८/१९९६ रोजी, प्रतिवादी क्र. ७ हे दिनांक २४/०४/२००९ रोजी व प्रतिवादी क्र. ९ हे दिनांक १३/११/२००५ रोजी मयत झालेचे अभिलेखावर दाखल अनुक्रमे निशाणी क्र. ३३ ते ३५ वरील मृत्यू दाखल्यावरुन दिसून येते. प्रस्तुतच्या दाव्याचे स्वरुप पाहता, वादीने प्रस्तुत अर्जामध्ये मागितलेल्या मूळ दाव्यात कोणताही बदल होणार नाही. वादी यांनी सदरचा दावा हा वाटपासाठी दाखल केला असल्यामुळे दाव्यात प्रत्येक पक्षकार हा आवश्यक पक्षकार आहे. वादीने मागीतलेली दुरुस्ती ही त्या अनुषंगाने आहे. वादीने मागितलेली प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास वादी व प्रतिवादी यांचेमधील खरा वाद गुणदोषावर मिटविण्यास मदत होणार आहे. दुरुस्तीस मंजूरी दिल्यास दाव्यातील गुंतागुंत कमी होणार आहे. उलटपक्षी प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी व प्रतिवादीमधील दाव्यांची संख्या वाढून अनेकविध दावे होण्याची शक्यता आहे. प्रसतुत अर्ज मंजूर केल्यास कोणतीही नविन केस अथवा दावा निर्माण होत नसून दाव्याचे स्वरुप बदलत नाही. तसेच प्रतिवादींना प्रस्तुत दुरुस्तीच्या अनुषंगाने पुरावा करण्याची संधी आहे. त्यामुळे न्यायाचे कारणास्तव प्रस्तुत अर्ज मंजूर करणेत येत आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी व मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.३ करिता खाली आदेश पारीत करते.

## <u>-आदेश -</u>

**१.** वादी यांचा निशाणी ३६ कडील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

**२.** वादी यांनी निशाणी क्र. ३६ कडील अर्जास अनुसरुन दाव्यात १४ दिवसांचे आत दुरुस्ती करावी व दाव्याची दुरुस्त प्रत सत्वर दाखल करावी.

**३.** अर्जाचा खर्च मुळ अर्जात समाविष्ठ करण्यात येत आहे.

**(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करण्यता आला)**

दिनांकः- १९/११/२०२१.

( एस.एन. निकम )
दुसरे सह. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
गडहिंग्लज